**<u>ठळक बातम्या</u>**

- असमानता रोखण्यासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावी यंत्रणा असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं मुंबईत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रतिपादन

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी मतदान सुरू / मतदानानंतर संध्याकाळी मतमोजणी होणार

- महाराष्ट्रात नॉन क्रिमीलेयरची आठ लाख रुपयांची वार्षिक उत्पन्नमर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आल्याची मंत्री अतुल सावे यांची विधानसभेत माहिती

- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मंजूर

**आणि**

- नेपाळमध्ये भूस्खलनामुळे दोन बस नदीत वाहून गेल्या / ६५ बेपत्ता प्रवाशांमध्ये ७ भारतीयांचा समावेश

**<><><><><>**

असमानता रोखण्यासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावी परिवर्तनशील यंत्रणा आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मुंबईत केलं. नरसी मोनजी व्यवस्थापकीय शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत होते. या संस्थेनं गेल्या अनेक वर्षांपासून देशाचं भविष्य घडवण्याच्या कामात मोठा हातभार लावल्याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गार काढले. वैदिक काळापासून भारताला उच्च

शिक्षणाची मोठी परंपरा असून प्राचीन भारतातल्या महाविद्यालयांनी समाजाला दिशा देणारी मूल्यं जपली आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान सुरू आहे. सर्व पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी मतदान कशाप्रकारे करावं, पसंतीक्रम कसा ठेवायचा याच्या सूचना आपापल्या आमदारांना दिल्या. या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीचे बारा उमेदवार रिंगणात आहेत. विजयी होण्यासाठी उमेदवाराला पहिल्या पसंतीची २३ मतं मिळणं आवश्यक आहे. दुपारी चार वाजेपर्यंत मतदान होणार असून त्यानंतर संध्याकाळी लगेच मतमोजणी होणार आहे.

भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे रिंगणात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी, काँग्रेसकडून प्रज्ञा सातव निवडणूक लढवत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने शेकापाचे जयंत पाटील विधान परिषदेची निवडणूक लढवत आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या विविध घटकांना शैक्षणिक प्रवेशासाठी असणारी नॉन क्रिमीलेयरची आठ लाख रुपयांची वार्षिक उत्पन्नमर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे, अशी माहिती इतर मागास  बहुजन कल्याण प्रवर्ग विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना संजय गायकवाड, नितीन राऊत आणि इतरांनी उपस्थित केली होती. जनतेचं जीवनमान आणि वेतन स्तर उंचावल्यामुळे ही मर्यादा वाढवण्याची मागणी त्यांनी केली.

रायगड जिल्ह्यात बोगस पावती पुस्तकं छापून गौण खनिज वाहतूक परवाने देणाऱ्या कंपनीचं कंत्राट रद्द करण्यात आलं आहे, त्याबाबत आधी उच्च न्यायालयात आणि आता आपल्याकडे सुनावणी सुरू आहे, अशी माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. संबधित कंपनीची उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

२०१३ सालच्या नवीन भूसंपादन कायद्याबाबत देशातल्या विविध उच्च न्यायालयांनी दिलेले निवाडे उपलब्ध करून घेऊन या महिना अखेरपर्यंत या कायद्यात सुधारणा करण्यासाठी कारवाई केली जाईल, अशी ग्वाही विखे पाटील यांनी दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना प्रकाश सोळंके यांनी उपस्थित केली होती. त्यावर प्राजक्त तनपुरे, बच्चू कडू यांनी उप प्रश्न विचारले.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं ईडीनं दाखल केलेल्या कथित मद्य धोरण प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज अंतरिम जामीन मंजूर केला. ईडीनं केलेल्या अटकेला आव्हान देणारी केजरीवाल यांची याचिका न्यायाधीश संजीव खन्ना आणि दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठानं मोठ्या खंडपीठाकडे पाठवली आहे. तथापि केजरीवाल यांना या प्रकरणी गेल्या २५ जूनला सी बी आय नं अटक केली होती, या प्रकरणात त्यांना जामीन मिळाला नसल्यानं ते कारागृहातच राहतील.

**<><><><><>**

माजी अग्निवीरांसाठी केंद्रीय सुरक्षा दलांच्या भरती प्रक्रियेत दहा टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यामध्ये सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल आणि सशस्त्र सीमा बल या केंद्रीय सुरक्षा दलांचा समावेश आहे. माजी अग्निवीरांना वयोमर्यादेच्या

अटीमध्ये देखील सवलत मिळेल, तसंच त्यांच्यासाठी कोणतीही शारीरिक क्षमता चाचणी होणार नाही.

<><><><><>

नीट परीक्षेतील पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय तपास पथक अर्थात सीबीआयनं राकेश रंजन उर्फ रॉकी याला अटक केली आहे. पेपर प्रकरणात तो मुख्य सुत्राधार असून त्याला दहा दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवण्यात आलं आहे. राकेश रंजन हा पेपर फुटीप्रकरणातील प्रमुख आरोपी संजीव मुखिया याचा जवळचा साथीदार आहे. मुखिया हा फरार असून त्याचा ठावठिकाणा राकेश रंजनकडून मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

याप्रकरणी तपास यंत्रणेनं झारखंडच्या हजारीबाग इथल्या ओएसिस शाळेचे मुख्याध्यापक अहसानुल हक आणि उपमुख्याध्यापक इम्तियाज यांच्यासह १२ जणांना अटक केली आहे. सीबीआय तसंच विविध राज्यांतील पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

<><><><><>

नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी सीबीआय कोठडीत असलेला आरोपी एन. गंगाधरन याच्या कोठडीत लातूरच्या न्यायालयानं आणखी चार दिवसांची वाढ केली आहे. त्याची कोठडी काल संपल्यानं त्याला न्यायालयात हजर केलं होतं.

दरम्यान, या प्रकरणी लातूरमध्ये गुन्हा दाखल असलेला ईरंना कोनगलवार हा अद्याप फरार असून त्याला अटक करण्याचं मोठं आवाहन सीबीआयपुढं आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना प्रकृती बिघडल्यामुळे काल दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याचं सांगण्यात आलं आहे.

<><><><><>

म्यानमारमधील सायबर घोटाळ्याशी संबंधित टोळ्यांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेल्या भारतीयांची लवकर सुटका करावी, अशी मागणी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्यानमारचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री यू थान स्वे यांच्याकडं केली आहे. बिमस्टेकच्या वतीनं आयोजित परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत काल याबाबत चर्चा झाली.

<><><><><>

या वर्षीच्या खरीप हंगामात कडधान्य लागवडीच्या क्षेत्रात वाढ झाल्याबद्दल केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आनंद व्यक्त केला आहे. नवी दिल्ली इथं खरीप पिकांच्या प्रगतीचा आढावा घेताना ते बोलत होते. तुरीसारख्या कडधान्याच्या लागवडीच्या क्षेत्रात पन्नास टक्क्यांनी वाढ झाली आहे. कडधान्य उत्पादनात देशाला स्वयंपूर्ण करण्याला प्राधान्य असेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

कर्नाटकमधल्या महर्षि वाल्मिकी अनुसूचित जमाती विकास महामंडळात झालेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी माजी मंत्री बी नागेंद्र यांना सक्तवसुली संचालनालयानं आज चौकशीसाठी ताब्यात घेतलं.

अनुसूचित जमाती विकास महामंडळातील १८७ कोटी रुपये बेकायदा हस्तांतरीत करण्यात आले. या प्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं काल मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये २० ठिकाणी छापे टाकले होते. त्यानंतर आज माजी मंत्री बी नागेंद्र यांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे.

<><><><><>

आसाममधल्या पूर परिस्थितीमध्ये काही अंशी सुधारणा झाली आहे. मात्र राज्यातल्या २६ जिल्ह्यांमधल्या अडीच हजार गावांत अजूनही पूरस्थिती कायम

आहे. आतापर्यंत या पुरामुळे राज्यातली ३९ हजार हेक्टरवरली पिकं नष्ट झाली आहेत.

राज्यातल्या ब्रह्मपुत्रा, बुढीदिहिंग, दिसांग आणि कुशियारा या नद्यांनी पूररेषेची पातळी ओलांडली आहे. दरम्यान, राज्याच्या विविध भागात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><>**

नेपाळमध्ये भूस्खलन झाल्यामुळे दोन प्रवासी बस आज पहाटे साडे तीन वाजण्याच्या नदीत वाहून गेल्या. दोन्ही बसमध्ये एकूण ६५ प्रवासी होते, यात ७ भारतीय नागरिकांचा समावेश आहे. चितवन जिल्ह्यात नारायणघाट - मुगलिंग पट्ट्यात भूस्खलन झाल्यामुळे या बस त्रिशूली नदीत पडल्या. यातल्या बीरगंजहून काठमांडूला चाललेल्या बसमध्ये ७ भारतीय प्रवास करत होते. नेपाळच्या सशस्त्र पोलीस दलानं घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरु केलं असून प्रधानमंत्री पुष्पकमल दहल यांनी आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीनं करण्याचे निर्देश दिले आहेत.

**<><><><>**

औरंगाबाद प्रारूप प्रकरणी इसिसच्या दोन सदस्यांवर राष्ट्रीय तपास संस्थेनं आज आरोपपत्र दाखल केलं. दहशतवादी कारवाया प्रकरणात सहभाग, देशभरातल्या युवकांची दहशतवाद प्रकरणात सहभागी होण्यासाठी नियुक्ती करण्याचं काम त्यांच्याकडे होतं , असं यात नमूद केलं आहे. फेब्रुवारी महिन्यात यापैकी एका आरोपीला NIA नं पकडलं होतं.

**<><><><>**

नेपाळचे प्रधानमंत्री पुष्प कमल दहल ‘प्रचंड’ यांच्यावरच्या विश्वासदर्शक ठरावावर आज नेपाळच्या संसदेत मतदान होणार आहे. २० महिन्यात पाचव्यांदा ते विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जात आहेत. दरम्यान नेपाळच्या संसदेतील नेपाळी

काँग्रेस, नेपाळ कम्युनिस्ट पार्टी आणि जनता समाजवादी पार्टी या पक्षांनी आपापल्या खासदारांना या विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात उभं राहावं यासाठी पक्षादेश जारी केला आहे. दरम्यान, विश्वासदर्शक ठरावाच्या आधीच प्रचंड यांनी आपलं शासकीय निवासस्थान सोडलं असून आपल्या घरी जाण्याची तयारी सुरू केली आहे.

**<><><><><>**